ePaper
वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827
# महाईन्यूज™
WWW.MAHAENEWS.COM | शनिवार, दि. 24 ऑक्टोबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## नेहा बोराला उच्च न्यायालयाचा झटका; पोलिसांच्या नोटिशीला आव्हान अपयशी




पान 3 वरुन...
पाणीगळतीवर 'जीपीएस'चा वॉच
















### पदवीधर-शिक्षक निवडणुक चुरशीचा सामना; महायुतीतील मतभेदांची कसोटी!

# १८२ उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद!

**महाईन्यूज । मुंबई**

**महाराष्ट्र विधान परिषदेच्या तीन पदवीधर आणि दोन शिक्षक मतदारसंघांसाठी आज, शुक्रवार (२३ ऑक्टोबर) मतदान प्रक्रिया पार पडली. राज्यातील पाच जागांसाठी झालेल्या या निवडणुकीत एकूण १८२ उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद झाले आहे. सत्ताधारी महायुती आणि विरोधी महाविकास आघाडीसाठी प्रतिष्ठेची ठरलेल्या या निवडणुकीत बंडखोरी, मित्रपक्षांतील मतभेद आणि स्थानिक राजकीय समीकरणांमुळे चुरस निर्माण झाली आहे. आता सर्वांचे लक्ष २७ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या मतमोजणीकडे लागले आहे.**

## पुणे विभागातील दुपारी दोन वाजेपर्यंतची आकडेवारी

पदवीधर मतदारसंघ :

**३९.७९ टक्के मतदान**

शिक्षक मतदारसंघ :

**४९.५४ टक्के मतदान**

सकाळी दहा वाजेपर्यंत पदवीधर मतदारसंघात ८.८६ टक्के, तर शिक्षक मतदारसंघात १२.९४ टक्के मतदान झाले होते. दुपारपर्यंत दोन्ही मतदारसंघांत मतदानाचा वेग वाढल्याचे वृत्त आहे. हे आकडे पुणे विभागातील मतदानाचे आहेत.



२७ ऑक्टोबरला मतमोजणी

## दहा लाखांहून अधिक मतदार

पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर पदवीधर तसेच पुणे आणि अमरावती शिक्षक मतदारसंघांसाठी ही निवडणूक घेण्यात आली. पाचही मतदारसंघांत मिळून १० लाख ६८ हजार ७२ मतदारांची नोंद असून, २ हजार ४१९ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली होती. मतदानाची वेळ सकाळी ८ ते सायंकाळी ४ अशी होती. या निवडणुकीत एकूण १८२ उमेदवार रिंगणात होते. सर्वाधिक ४७ उमेदवार पुणे पदवीधर मतदारसंघात, तर सर्वांत कमी २६ उमेदवार अमरावती शिक्षक मतदारसंघात होते. पुणे विभागातील मतदानाच्या टप्प्याटप्प्याने जाहीर झालेल्या आकडेवारीत शिक्षक मतदारसंघात तुलनेने अधिक मतदान झाल्याचे दिसले.

## नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि अमरावतीतही चुरस

नागपूर पदवीधर :* विद्यमान आमदार अभिजित वंजारी आणि भाजपचे सुधाकर कोहळे यांच्यात प्रमुख सामना होता. भाजपचे बंडखोर अनिल सोले यांनी माघार घेत कोहळे यांना पाठिंबा दिला असला, तरी मतपत्रिकेवर त्यांचे नाव राहणार असल्याचे वृत्त आहे.

छत्रपती संभाजीनगर पदवीधर : विद्यमान आमदार सतीश चव्हाण आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरदचंद्र पवार पक्षाचे प्रतापसिंह पाटील यांच्यासह ४१ उमेदवार रिंगणात होते. येथेही पक्षीय ताकद आणि उमेदवारांची वैयक्तिक संपर्कयंत्रणा महत्त्वाची ठरणार आहे.

अमरावती शिक्षक : विद्यमान आमदार किरण सरनाईक हे शिवसेनेच्या तिकिटावर निवडणूक लढवत असून, काँग्रेसच्या अदिती पोहरे यांच्यासह एकूण २६ उमेदवार रिंगणात होते. या मतदारसंघातील लढतीकडेही महायुती आणि विरोधकांचे लक्ष लागले आहे. या तीन मतदारसंघांतील अंतिम मतदानाची टक्केवारी आणि जिल्हानिहाय मतदानाचा अधिकृत तपशील उपलब्ध झाल्यानंतरच मतदारांच्या प्रतिसादाचे तुलनात्मक चित्र स्पष्ट होईल. निकालानंतरच महायुती आणि महाविकास आघाडीच्या संघटनात्मक ताकदीचे विश्लेषण केले जाऊ शकते. मात्र, मतदानाच्या क्केवारीवरूनच कोणता उमेदवार विजयी होईल, असा निष्कर्ष काढता येणार नाही.

# पंतप्रधान मोदींचा बारामती दौरा लांबणीवर!

## हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रोच्या उद्‌घाटनाचा मुहूर्त पुन्हा हुकणार!

**महाईन्यूज । पुणे**

**गेल्या तीन महिन्यांहून अधिक काळ हिंजवडी ते शिवाजीनगरच्या २३ किलोमीटरदरम्यान केवळ रिकाम्या फेऱ्यांद्वारे चाचणी (ट्रायल रन) घेणाऱ्या हिंजवडी-शिवाजीनगर पुणेरी मेट्रोला पुढील काही दिवस प्रवाशांविनाच फिरावे लागणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा तीन नोव्हेंबरचा नियोजित बारामती दौरा पुढे ढकलला गेल्याने या दौऱ्यादरम्यान हिंजवडी मेट्रोच्या उद्‌घाटनाला आता पुन्हा नव्या मुहूर्ताचा शोध घ्यावा लागणार आहे. मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांची (सीएमआरएस) परवानगी मिळूनही शंभर दिवसांहून अधिक काळ प्रवाशांविनाच सतत धावणाऱ्या या मेट्रोची इतिहासात कायमस्वरूपी नोंद होणार आहे.**



हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रोच्या १७ स्थानकांना 'सीएमआरएस'ची परवानगी प्राप्त झाली असून, पंतप्रधानांच्या बारामती दौऱ्यातच या मेट्रोचे उद्‌घाटन करण्याचे संकेत दिले जात होते. त्यामुळे दिवाळीच्या दरम्यान सुट्ट्या असल्या, तरी त्यानंतर आयटी कर्मचाऱ्यांना या सेवेचा लाभ घेता येणे शक्य झाले असते. मात्र, ऐन वेळी पंतप्रधान मोदी यांचा बारामती दौरा पुढे ढकलण्यात आल्याचे प्रशासकीय अधिकारी आणि पोलिस अधिकाऱ्यांकडून सांगण्यात येत असून, या मेट्रोची नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यातील डेडलाइन पुन्हा हुकणार आहे.

मूळ आराखड्यानुसार गेल्या वर्षी मार्चमध्ये सुरू होणाऱ्या हिंजवडी मेट्रोचे काम सातत्याने लांबत गेले. मार्च २०२६च्या मुदतीमध्येही ही मेट्रो सुरू होऊ शकली नाही. त्यामुळे मुख्यमंत्री कार्यालयाने हस्तक्षेप करून जुलैपर्यंत पहिला १२ किलोमीटरचा टप्पा सुरू करण्याचा आदेश दिला. त्यानंतर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) आणि पुणे आयटी सिटी मेट्रो यांनी प्रयत्न करून पहिल्या टप्प्यातील १२ स्थानकांचे काम पूर्ण केले.

'सीएमआरएस' यांची पाहणी झाल्यानंतर १२ स्थानकांपर्यंत मेट्रो सुरू करण्यासाठी आवश्यक परवानगी देण्यात आली. मात्र, या १२ स्थानकांऐवजी थेट जिल्हा न्यायालयापर्यंत मेट्रो नेल्यास त्याचा अधिक फायदा होईल, असे लक्षात आल्याने आणखी पाच स्थानके पूर्ण करून त्याची आवश्यक परवानगी घेण्यात आली. त्यामुळे मेट्रो सुरू होणार असे वाटत असतानाच विधान परिषद निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे पुन्हा त्याचे उद्‌घाटन लांबणीवर पडले.

### राज्य सरकारचे अपयश

राज्य सरकारने ही मेट्रो प्रवाशांच्या सेवेत दाखल व्हावी यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. पीएमआरडीएसह पुणे आयटी सिटी मेट्रोलाही सरकारने धारेवर धरले होते. मात्र, आता सर्व परवानग्या मिळाल्यानंतर मेट्रो प्रवाशांसाठी सुरू व्हावी, याकडे लक्ष देण्याऐवजी उद्‌घाटनाचा सोस भागविण्यासाठी टाळाटाळ केली जात आहे. खरे तर, एखादे स्थानक जाणीवपूर्वक बाजूला ठेवून उर्वरित सर्व स्थानकांदरम्यान मेट्रो सेवासुरू करण्याची गरज आहे. या स्थानकाचे आणि प्रत्यक्ष सेवेचे औपचारिक उद्‌घाटन पंतप्रधानांची वेळ मिळाल्यावर औपचारिक स्वरूपात करता येऊ शकते.

## कोट्यवधींच्या खर्चानंतरही पुण्याची हवा प्रदूषितच; ४१८ कोटींचा निधी मंजूर

**महाईन्यूज । पुणे**

**केंद्र सरकारकडून स्वच्छ हवेसाठी पुणे महापालिकेला सात वर्षांत ४१८.४५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. त्यापैकी २७५.२८ कोटी रुपये महापालिकेकडून खर्च करण्यात आले. मात्र, अद्यापही शहरातील हवा प्रदूषण कमी झाले नसून, राष्ट्रीय हवा गुणवत्ता मानकांची पूर्तता न करणाऱ्या शहरांमध्ये पुण्याचा समावेश आहे. त्यामुळे प्रदूषणाच्या मूळ स्रोतांवर लक्ष केंद्रित करणाऱ्या सर्वसमावेशक उपाययोजना राबविण्याची गरज तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.**



केंद्र सरकारकडून पुणे शहराला स्वच्छ हवेसाठी गेल्या सात वर्षांत ४१८.४५ कोटी रुपये मंजूर करण्यात आले. त्यात राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रमाअंतर्गत ९.४५ कोटी रुपये, तर १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत ४०९ कोटी रुपये देण्यात आले होते. त्यातील २७५.२८ कोटी रुपये म्हणजे, ६६ टक्के निधी महापालिकेकडून विविध उपाययोजनांवर खर्च करण्यात आला. या बाबत केंद्र सरकारच्या 'पोर्टल फॉर रेग्युलेशन ऑफ एअर पॉल्युशन इन नॉन-अटेनमेंट सिटीज' या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेआहे.

'पुणे एअर ॲक्शन हब' या संस्थेला माहितीच्या अधिकारातून मिळालेल्या माहितीनुसार, या निधीचा वापर रस्ते, पायाभूत सुविधा, सार्वजनिक वाहतूक, स्मशानभूमी, कचरा व्यवस्थापनाच्या कामांसाठी करण्यात आला. पुणे शहरात १२१.४ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची देखभाल-दुरुस्तीची कामे करण्यात आली. तर १९ किलोमीटर लांबीच्या पदपथ दुरुस्तीसाठी हा निधी वापरण्यात आला. तसेच, रस्त्यांवरील धुळीचे प्रमाण कमी करण्यासाठी महापालिकेने रस्ते सफाईसाठी दोन यंत्रे, १९ स्प्रिंकलर्स सुरु केले. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करण्यासाठी ३६ नवीन इलेक्ट्रिक बस खरेदी करण्यात आल्या. त्यासाठी ६५ नवीन चार्जिंग स्टेशन्स उभारण्यात आली. सहा सुका कचरा संकलन केंद्रे आणि बांधकाम- पाडकामातून निर्माण होणाऱ्या कचऱ्यासाठी चार स्वतंत्र संकलन केंद्रे स्थापन करण्यात आली.

दरम्यान, शहरातील 'पीएम-१०' हवा प्रदूषणासाठी धूळ हा घटक मोठ्या प्रमाणात कारणीभूत असल्याचे अभ्यासांतून समोर आले आहे. पुण्यातील हवेची गुणवत्ता गेल्या काही वर्षांमध्ये सातत्याने खालावत असून, 'पीएम-१०' प्रदूषण कमी करण्याचे आव्हान आहे. गेल्या वर्षी (२०२५-२६) 'पीएम-१०'चे वार्षिक सरासरी प्रमाण १०१ मायक्रोग्रॅम प्रति घनमीटर नोंदवण्यात आले. गेल्या सात वर्षांमधील धुलिकणाचे हे प्रमाण सर्वाधिक असून, राष्ट्रीय मानकानुसार हवेतील धुलिकणांसाठी ६० मायक्रोग्रॅम प्रतिघनमीटरची मर्यादा घालून देण्यात आली आहे.

### 'पीएम-१०' म्हणजे काय?

'पीएम-१०' म्हणजे हवेत तरंगणारे आणि श्वासावाटे शरीरात प्रवेश करू शकणारे १० मायक्रोमीटर किंवा त्यापेक्षा कमी व्यासाचे सूक्ष्म कण. हे कण श्वसनमार्गात प्रवेश करून श्वसनसंस्थेचे आजार तसेच फुफ्फुसे आणि हृदयाशी संबंधित आजारांची तीव्रता वाढवू शकतात.

# पाणीगळतीवर 'जीपीएस'चा वॉच; दुर्लक्ष करणाऱ्यांवर कारवाई!

## तक्रारींसाठी छायाचित्रांसह नोंदणी; आयुक्तांचे कडक निर्देश

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**शहरातील पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेने कडक पावले उचलली आहेत. पाणीगळतीच्या तक्रारी अचूक भौगोलिक स्थानासह (जीपीएस) आणि छायाचित्रांसह नोंदविता याव्यात, यासाठी स्वतंत्र यंत्रणा विकसित करण्याचे आदेश महापालिका आयुक्त विजय सूर्यवंशी यांनी पाणीपुरवठा आणि माहिती व तंत्रज्ञान विभागाला दिले आहेत. तक्रार प्राप्त होताच गळतीची दुरुस्ती करणे बंधनकारक असून, या कामात दुर्लक्ष करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार आहे.**



राज्य शासनाच्या आदेशानुसार ऑगस्ट २०२७ अखेरपर्यंत पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्यासाठी शहरात १६ ऑक्टोबरपासून दहा टक्के पाणी कपात लागू करण्यात आली आहे. शहराला मागील सात वर्षांपासून एक दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. पिंपरी-चिंचवडसाठी पवना धरणातून ६.५५ टीएमसी, भामा आसखेड धरणातून २.१५ टीएमसी आणि आंद्रा धरणातून १.२९ टीएमसी असे एकूण ९.९९ टीएमसी पाणी आरक्षण मंजूर आहे. सुमारे ३८ लाख लोकसंख्या असलेल्या शहराला दररोज ६५० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा केला जातो. पाणी कपातीच्या काळात उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करण्यासह गळती रोखण्यावर महापालिकेने भर दिला आहे.

नव्या यंत्रणेद्वारे नागरिकांना पाणीगळतीचे अचूक ठिकाण आणि छायाचित्रांसह तक्रार नोंदविता येणार आहे. तक्रार प्राप्त झाल्यानंतर संबंधित ठिकाणी तातडीने पथक पाठवून दुरुस्ती करावी, तसेच दुरुस्तीपूर्वी आणि दुरुस्तीनंतरची छायाचित्रे व कार्यवाहीचा तपशील नोंदवावा, असे निर्देश देण्यात आले आहेत. तक्रारींचे निराकरण वेळेत होत आहे की नाही, याचा नियमित आढावा घेतला जाणार आहे.

महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीसह सर्व क्षेत्रीय कार्यालये, रुग्णालये, शाळा, भाजी मंडई आणि अन्य इमारतींमधील नळ, पाणीपुरवठ्याची उपकरणे व स्वच्छतागृहांतील फ्लश टाक्यांची तपासणी करण्याचे आदेश स्थापत्य विभागाला देण्यात आले आहेत. या ठिकाणी आढळणारी गळती तातडीने दुरुस्त करून पाण्याचा अपव्यय थांबविण्याची जबाबदारी संबंधित विभागांवर सोपविण्यात आली आहे. महापालिकेच्या इमारतींमधील गळतीची नियमित तपासणी करण्याच्या सूचनाही प्लंबरांना देण्यात आल्या आहेत.

पिण्याच्या पाण्याची बचत करण्यासाठी महापालिकेच्या सर्व प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे. सार्वजनिक शौचालयांमध्ये गरजेपेक्षा अधिक पाणी वापरले जाणार नाही, याची दक्षता आरोग्य विभागाला घ्यावी लागणार आहे. क्रीडांगणांवर पाणी फवारणीसाठी पिण्याच्या पाण्याचा वापर टाळून प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा वापर करण्याच्या सूचना क्रीडा विभागाला देण्यात आल्या आहेत. उद्यानांमधील झाडे आणि हिरवळीला पाणी देण्यासाठीही प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा वापर करण्याचे नियोजन उद्यान विभागाने करावे, असे आदेश देण्यात आले आहेत.

पाणीबचत आणि अपव्यय रोखण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे आयुक्त विजय सूर्यवंशी यांनी स्पष्ट केले आहे. गळती शोधणे, दुरुस्तीचा पाठपुरावा करणे आणि पाण्याचा अपव्यय रोखण्याच्या कामात निष्काळजीपणा करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई केली जाणार आहे. याउलट, पाणीबचतीसाठी प्रभावी काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात येणार असल्याचेही आयुक्तांनी सांगितले.

### पाणीबचतीसाठी आयुक्तांचे निर्देश

पाणीगळतीची तक्रार मिळताच दुरुस्ती करावी. महापालिकेच्या इमारतींतील गळती रोखावी. उद्याने व मैदानांसाठी प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा वापर करावा. निष्काळजीपणा करणाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई, तर प्रभावी काम करणाऱ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

# पिंपरी-चिंचवडच्या कचऱ्यात ६०० टनांची वाढ; गौडबंगाल काय?

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरात दररोज सुमारे दीड हजार टन कचरा निर्माण होत असताना प्रत्यक्षात दोन हजार १०० टन कचरा संकलित होत असल्याची नोंद आहे. वजन आणि वाहनांच्या फेरीनुसार ठेकेदारांना देयके दिली जात असल्याने अधिक पैसे मिळविण्यासाठी शहराच्या हद्दीबाहेरील कचरा उचलला जात असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर यांनी केला आहे. मात्र, मोशी कचरा डेपोतील प्रक्रिया प्रकल्प बंद असल्याने शहरात साचलेला जुना कचरा उचलला जात आहे. त्यामुळे वजन वाढल्याचे स्पष्टीकरण महापालिका प्रशासनाने दिले आहे.**



शहरातील कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी मोशी डेपोमध्ये वीजनिर्मिती, गांडूळ खत आणि सीएनजी निर्मितीचे प्रकल्प आहेत. मात्र, आठ जुलैच्या दुर्घटनेनंतर वेस्ट टू एनर्जी प्रकल्प बंद असल्याने कचरा व्यवस्थापन विस्कळीत झाले आहे. अनेक भागांत कचऱ्याचे ढीग साचले असून, तो उचलून डेपोमध्ये नेला जात आहे. त्यामुळे संकलनाचे वजन वाढल्याचा दावा आरोग्य विभागाने केला आहे.

शहरातील कचरा संकलनासाठी २८ केंद्रे आणि सुमारे ५२० वाहनांचा वापर केला जातो. यातील काही वाहनांचे आयुर्मान संपलेले असतानाही वापर सुरू असल्याने कारवाई केली जाणार आहे. घरोघरचा कचरा संकलन आणि वर्गीकरणाची जबाबदारी आरोग्य विभागाकडे, तर त्यावर प्रक्रिया करण्याचे काम पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडे आहे.

आरोग्य विभागाचे उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी हद्दीबाहेरील कचरा उचलला जात असल्याचा आरोप फेटाळला. साचलेला जुना कचरा संपल्यानंतर दररोजचे वजन पूर्ववत होईल. शहराबाहेरील कचरा आणणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली असून, संकलन लवकरच सुरळीत होईल, असे त्यांनी सांगितले.

दरम्यान, ठेकेदारांना वजन आणि फेरीनुसार देयके दिली जात असल्याने कचरा संकलनाच्या नोंदी, वाहनांच्या फेऱ्या आणि वजनाची चौकशी करावी, अशी मागणी मारुती भापकर यांनी केली आहे.

### कचरा संकलनाचे गणित...

शहरात दररोज दीड हजार टन कचरा निर्माण होत असताना संकलनाची नोंद २१०० टनांवर पोहोचली आहे. वजन आणि फेरीनुसार ठेकेदारांना देयके दिली जात असल्याने या वाढीव वजनाची चौकशी करण्याची मागणी होत आहे.



## भूमिका

**दसरा आला की रावणाचे दहन होते, सोने लुटले जाते आणि राजकारणात आरोप-प्रत्यारोपांची आतषबाजी सुरू होते. यंदाही उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्या दसरा मेळाव्यांतून महाराष्ट्राला राजकारणाचे दोन वेगवेगळे चेहरे पाहायला मिळाले.**

# शब्दांची मशाल आणि मदतीचा ट्रक!




एका बाजूला ठाकरेंच्या भाषणातील आक्रमकता, तर दुसरीकडे शिंदेंच्या मदतीच्या घोषणा! मात्र, भाषणांची धार आणि मदतीच्या आश्वासनांपलीकडे जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक किती होते, हा खरा प्रश्न आहे.

उद्धव ठाकरेंच्या भाषणात संताप, उपरोध आणि भाजपविरोधाची धार कायम आहे. मात्र, शिवसेनेतील फुटीनंतर पक्षाचे कमी झालेले संघटनात्मक बळ त्यांच्या राजकीय प्रभावावर परिणाम करत आहे. अनेक मुद्द्यांवर एकाच वेळी बोलल्यामुळे भाषणाचा केंद्रबिंदू हरवतो. विरोधक म्हणून त्यांच्याकडे सरकारला धारेवर धरण्यासाठी अनेक मुद्दे आहेत; परंतु केवळ टीका करून राजकीय प्रभाव वाढत नाही. जनतेच्या प्रश्नांवर सातत्यपूर्ण आंदोलन आणि ठोस पर्याय देणे आवश्यक आहे.

दुसरीकडे, एकनाथ शिंदे यांनी मदतीच्या घोषणांतून 'देणारा नेता' अशी प्रतिमा निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. शेतकऱ्यांना मदत, दिवाळीचा शिधा, महिलांसाठी शिवणयंत्रे आणि मुलींसाठी सायकली अशा घोषणांतून त्यांनी जनतेपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. संकटातील कुटुंबांना तातडीचा दिलासा देणे महत्त्वाचे आहे. मात्र, मदतीच्या घोषणांबरोबरच त्यांची अंमलबजावणी आणि दीर्घकालीन परिणामही महत्त्वाचे आहेत.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्याला आर्थिक मदत मिळणे गरजेचे आहेच; पण पिकाला योग्य भाव, सिंचनासाठी पाणी आणि कर्जाच्या विळख्यातून बाहेर पडण्याची संधी मिळणे अधिक महत्त्वाचे आहे. दिवाळीचा शिधा उपयोगी असला, तरी वाढत्या महागाईत वर्षभर संसार चालविण्याची क्षमता निर्माण करणे ही सरकारची जबाबदारी आहे. लोकशाहीत विरोधकांनी सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारले पाहिजेत, तर सत्ताधाऱ्यांनी कृतीतून उत्तरे दिली पाहिजेत. उद्धव ठाकरेंनी शब्दांच्या मशालीला संघटनात्मक ताकद आणि ठोस कृतीची जोड द्यावी. एकनाथ शिंदेंनी मदतीच्या ट्रकपलीकडे जाऊन सामान्य नागरिकांना सुरक्षित भविष्याची हमी द्यावी.

दसऱ्याला सोने लुटण्याची परंपरा आहे; पण जनतेचा विश्वास कमवावा लागतो. महाराष्ट्राला केवळ भाषणांचा धुरळा किंवा आश्वासनांची आतषबाजी नको आहे. संकटात मदत करणारे आणि संकटांची पुनरावृत्ती रोखणारे सक्षम नेतृत्व हवे आहे. कारण राजकारणाचे खरे यश मेळाव्यांतील टाळ्यांत नसते, तर सामान्य माणसाच्या जीवनात घडणाऱ्या सकारात्मक बदलांत असते.

## प्रासंगिक »

### न दिसणारा पूल

**एका गावाजवळ खोल दरी होती. दरीच्या पलीकडे एक छोटी वस्ती होती. पावसाळ्यात नदीला पूर आल्यामुळे दोन्ही गावांतील संपर्क तुटायचा. त्यामुळे आजारी माणसांना मदत पोहोचवणेही कठीण व्हायचे.**

एकदा गावात नवीन अभियंता आला. त्याने पूल बांधण्याची योजना मांडली. काही गावकऱ्यांनी खर्चाचे कारण देत विरोध केला. मात्र, एका वृद्ध शेतकऱ्याने सांगितले, "आज आपल्याला खर्च दिसतोय; पण उद्या याच पुलामुळे कित्येकांचे आयुष्य सोपे होईल."

अभियंत्याने गावकऱ्यांना एकत्र आणले. काहींनी दगड दिले, काहींनी श्रमदान केले, तर काहींनी बांधकामासाठी पैसे जमा केले. अनेक दिवसांच्या मेहनतीनंतर पूल तयार झाला. काही महिन्यांनी मुसळधार पाऊस पडला. नदीला पूर आला; पण पुलामुळे रुग्णवाहिका वेळेत वस्तीपर्यंत पोहोचली आणि एका गंभीर आजारी व्यक्तीचे प्राण वाचले.

त्या दिवशी गावकऱ्यांना जाणवले की त्यांनी केवळ नदीवर पूल बांधला नव्हता, तर माणुसकीचा मार्गही खुला केला होता.

- तात्पर्य : सामूहिक प्रयत्नांतून उभे राहिलेले कार्य अनेकांच्या जीवनात आशेचा मार्ग निर्माण करते.

**डिजिटल व्यवहारांच्या वाढत्या युगात बँकांवरील विश्वास हा आर्थिक व्यवस्थेचा कणा आहे. मात्र, भारतीय स्टेट बँकेच्या सुमारे चार हजार ग्राहकांची वैयक्तिक माहिती चोरीला जाऊन डार्क वेबवर आल्याच्या घटनेने या विश्वासालाच धक्का बसला आहे.**

# बँकिंग सुरक्षेला सायबरचा सुरुंग!

बँकेची मुख्य यंत्रणा सुरक्षित असून ठेवींना धोका नसल्याचा दावा केला जात असला, तरी ग्राहकांची वैयक्तिक माहिती असुरक्षित होणे ही गंभीर बाब आहे. पैसा सुरक्षित असणे आणि ग्राहकाची ओळख सुरक्षित असणे, या दोन वेगळ्या गोष्टी आहेत.




डार्क वेबवर उपलब्ध झालेल्या माहितीमध्ये ग्राहकांची नावे, जन्मतारीख, फोन क्रमांक आणि ई-मेल यांसारख्या तपशीलांचा समावेश असल्याचे सांगितले जाते. अशा माहितीच्या आधारे सायबर गुन्हेगार ग्राहकांना लक्ष्य करून बनावट संदेश, फसवे फोन आणि आर्थिक आमिषांच्या माध्यमातून फसवणूक करू शकतात. त्यामुळे खात्यातील रक्कम सुरक्षित असल्याचे सांगून बँकेला जबाबदारीतून मुक्त होता येणार नाही. ग्राहकांच्या माहितीचे संरक्षण करणे हीदेखील बँकेची मूलभूत जबाबदारी आहे.

देशात डिजिटल व्यवहारांचा विस्तार वेगाने होत असताना सायबर गुन्ह्यांचे आव्हानही वाढत आहे. बनावट बँक अधिकारी बनून फोन करणे, ओटीपी मिळवणे, लिंकवर क्लिक करण्यास भाग पाडणे आणि डिजिटल अरेस्टच्या नावाखाली धमकावणे अशा प्रकारांतून नागरिकांची फसवणूक केली जाते. विशेषतः ज्येष्ठ नागरिक या गुन्हेगारांचे लक्ष्य ठरतात. जनजागृती आवश्यक असली, तरी केवळ ग्राहकांनी सावध राहावे, असे सांगून चालणार नाही. बँकांनीही माहितीच्या सुरक्षेसाठी अधिक प्रभावी उपाययोजना करणे गरजेचे आहे.

स्टेट बँकेसारख्या मोठ्या संस्थेच्या सुरक्षाव्यवस्थेत त्रुटी कशी निर्माण झाली, माहिती नेमकी कुठून चोरीला गेली आणि भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी कोणते उपाय केले जाणार आहेत, याची स्पष्ट उत्तरे मिळाली पाहिजेत. नियमित सुरक्षा तपासणी, संशयास्पद हालचालींचे निरीक्षण, तातडीने त्रुटी दूर करणे आणि ग्राहकांना वेळेवर सूचना देणे आवश्यक आहे. सायबर हल्ले पूर्णपणे रोखणे कठीण असले, तरी त्यांचा धोका कमी करणे आणि संभाव्य नुकसान मर्यादित ठेवणे शक्य आहे. बँकेत खाते उघडताना ग्राहक आपली माहिती सुरक्षित राहील, असा विश्वास ठेवतो. तो विश्वास टिकविण्याची जबाबदारी बँकांची आणि संबंधित यंत्रणांची आहे. माहिती चोरीला गेल्यानंतर ग्राहकांनाच सतर्क राहण्याचा सल्ला देणे पुरेसे नाही. बँकांनी पारदर्शकता राखून तपासाचे निष्कर्ष आणि सुधारात्मक उपाय ग्राहकांसमोर मांडले पाहिजेत.

डिजिटल बँकिंगचा पाया विश्वासावर उभा आहे. हा विश्वास डळमळीत झाला, तर तंत्रज्ञानाच्या प्रगतीवरही प्रश्नचिन्ह निर्माण होईल. त्यामुळे ग्राहकांच्या पैशाबरोबरच त्यांच्या वैयक्तिक माहितीचे संरक्षण सर्वोच्च प्राधान्याने केले पाहिजे. अन्यथा, 'बँकांवरही भरवसा नाय का?' हा प्रश्न ग्राहकांच्या मनात अधिक तीव्र होत राहील.

## ।। अभंगवाणी ।।



न करीं रे संग राहें रे निश्चळ ।
लागों नेदीं मळ ममतेचा ॥१॥

या नांवें अद्वैत खरें ब्रम्हज्ञान ।
अनुभवावांचून बडबड ते ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# दुष्काळाचा रत्नागिरी जिल्ह्याला मोठा फटका!

## १२,८५० हेक्टरवरील पिके उद्‌ध्वस्त; ४३,९७८ शेतकरी संकटात

**महाईन्यूज । मुंबई**

**पावसाच्या अनियमिततेने आणि दुष्काळी परिस्थितीने रत्नागिरी जिल्ह्यातील शेतीचे कंबरडे मोडले आहे. पिके हातची गेल्याने शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे ठाकले असून, जिल्ह्यातील सर्व नऊ तालुक्यांमध्ये तब्बल १२ हजार ८५० हेक्टर क्षेत्रावरील उभी पिके बाधित झाली आहेत. प्रशासनाने केलेल्या पंचनाम्यांच्या अहवालातून ही भीषण परिस्थिती समोर आली आहे. जिल्ह्यातील तब्बल ४३ हजार ९७८ शेतकऱ्यांना दुष्काळाचा थेट फटका बसला असून, शेतीच्या नुकसानीमुळे बळीराजाच्या चिंतेत मोठी भर पडली आहे.**



> “ नुकसानिचे पंचनामे पुर्ण झाले आहेत. याविषयाची माहिती शासनाला पाठविण्यात आली आहे. जिल्ह्यावर दुष्काळाचे सावट आहे. शासनाकडून लवकरच जिल्ह्यातील शेतकरी वर्गाला नुकसान भरपाई मिळेल.
> **- शिवकुमार सदाफुले, जिल्हा कृषी अधिक्षक, रत्नागिरी**

दुष्काळी परिस्थितीची तीव्रता जिल्ह्याच्या विविध भागांत वेगवेगळ्या स्वरूपात दिसून येत आहे. रत्नागिरी तालुक्यात सर्वाधिक २ हजार ४५४ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले असून, ६ हजार ९०८ शेतकरी बाधित झाले आहेत. त्यापाठोपाठ संगमेश्वर तालुक्यात १ हजार ८९० हेक्टरवरील पिकांना फटका बसला असून, ६ हजार ७९० शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. पिकांच्या नुकसानीचे हे आकडे ग्रामीण अर्थव्यवस्थेसमोरील गंभीर आव्हान अधोरेखित करतात.

राजापूर आणि चिपळूण तालुक्यांतही दुष्काळाने शेतीचे मोठे नुकसान केले आहे. राजापूरमध्ये १ हजार ७८० हेक्टरवरील पिके बाधित झाली असून, ५ हजार २०० शेतकरी संकटात सापडले आहेत. चिपळूण तालुक्यात १ हजार ६१० हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले असून, ५ हजार १०० शेतकऱ्यांना त्याचा फटका बसला आहे. खेड तालुक्यातही १ हजार ५९७ हेक्टरवरील पिकांच्या नुकसानीची नोंद करण्यात आली असून, ४ हजार ६०० शेतकरी बाधित झाले आहेत.

दापोली, लांजा आणि गुहागर तालुक्यांतील शेतकऱ्यांनाही दुष्काळाची झळ सोसावी लागत आहे. दापोलीत १ हजार १०० हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले असून, ५ हजार २०० शेतकरी बाधित झाले आहेत. लांजा तालुक्यात १ हजार ९ हेक्टरवरील पिकांना फटका बसला असून, ४ हजार ४०० शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. गुहागरमध्ये ७८० हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून, ३ हजार ४८० शेतकऱ्यांना दुष्काळाचा सामना करावा लागत आहे.

मंडणगड तालुक्यात तुलनेने कमी, म्हणजे ६३० हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. मात्र, या तालुक्यातील २ हजार ३०० शेतकरीही दुष्काळाच्या संकटातून सुटलेले नाहीत.एकूणच, जिल्ह्यातील १२,८५० हेक्टरवरील पिकांचे नुकसान आणि ४३,९७८ बाधित शेतकऱ्यांची संख्या दुष्काळाची व्याप्ती स्पष्ट करते. पंचनाम्यांतून नुकसानीचे चित्र समोर आले असले, तरी बाधित शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मदत मिळण्याकडे आता लक्ष लागले आहे. शेतीच्या उत्पन्नावर अवलंबून असलेल्या हजारो कुटुंबांसाठी आर्थिक नुकसान भरून काढणे मोठे आव्हान ठरणार आहे.

---

## ‘मनोज जरांगेंचा वापर झाल्यानंतर त्यांच्या बदनामीचा प्रयत्न’, राज ठाकरे

**महाईन्यूज । मुंबई**

**मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी एक ऑडिओ क्लिप पत्रकार परिषदेत ऐकवून दाखविल्यानंतर राज्यातील राजकारण ढवळून निघाले आहे. या क्लिपमध्ये खासदार श्रीकांत शिंदे यांच्याकरवी मनोज जरांगे यांना ५०० कोटी रुपये दिल्याचा दावा केला गेला. शिवसेना शिंदे गटाने हा एकनाथ शिंदेंच्या बदनामीचा डाव असल्याचे सांगत क्लिपमध्ये बोलणारे लोक भाजपाचे आहेत, असे म्हटले. तर भाजपाने क्लिपची सत्यता पडताळण्यासाठी चौकशीची मागणी केली. दरम्यान राज ठाकरे यांनीही या प्रकरणी आता मोठे भाष्य केले आहे.**





### दिवाळीनंतर दुष्काळ दौरा करणार

दिवाळीनंतर राज ठाकरे दुष्काळी भागाचा दौरा करून पाणी टंचाईचा आढावा घेणार आहेत. आज मनसे पदाधिकाऱ्याच्या बैठकीनंतर त्यांनी याबाबतची माहिती दिली. मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये भीषण परिस्थिती असताना राज ठाकरे म्हणाले की, सरकारने दिलेल्या पाच हजार रुपयांच्या मदतीने काहीही होणार नाही. मराठवाड्यात पाण्याचे नियोजन नीट केले नाही तर तिथे वाळवंट होण्याची शक्यता आहे, याबद्दल मी आधीपासून बोलत आलो आहे. पण याचा विचार केला जात नाही.

राज ठाकरे माध्यमांशी बोलत असताना त्यांना याबाबतचा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर ते म्हणाले, “क्लिपमध्ये उल्लेख असलेल्या ५०० कोटी रुपयांचा हा प्रश्न नाही. तर कशाप्रकारे प्लॅनिंग केले जाते, तो मूळ प्रश्न आहे. मनोज जरांगे पाटील सारख्या माणसाला बदनाम करण्याचा प्रयत्न होत आहे. एखाद्या माणसाला बरोबर घ्यायचे, नंतर त्याला बदनाम करायचे. त्याची माणसे फोडायची, हे चाललंय काय?”

राज ठाकरे पुढे म्हणाले, “या क्लिपमध्ये बोलणारे कोण होते, हे आम्हालाही माहीत आहे. त्यांनी या गोष्टीचा विचार केला पाहिजे. ज्या वेळी सत्ता जाईल, तेव्हा कोणकोणत्या गोष्टी अंगाशी येतील, याचा त्यांना अंदाज नाही. तिसरा सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे, ही क्लिप बाहेर आली कुठून?”

मराठवाड्यात पाण्याचे नियोजन केले जात नाही. अवैधरीत्या बोर खणल्या जात आहेत. बिअरच्या कारखान्यांना परवाने दिले जात आहेत. टॅप वॉटरचे पाणी विकले जात आहे. विहिरीतून पाण्याचा उपसा अवैध कामासाठी सुरू आहे, अशी माहिती देताना राज ठाकरे यांनी याबाबत काटेकोर नियोजन करण्याचे आवाहन केले.

सध्या पिण्याच्या आणि शेतीच्या पाण्याची गरज आहे. त्यामुळे कुंभमेळा, इतर धार्मिक कार्यक्रमांचा विचार केला जावा, असा सल्ला राज ठाकरे यांनी दिला. नाशिकमध्ये होणाऱ्या आगामी कुंभमेळ्याबाबत प्रश्न विचारला असता त्यांनी ही प्रतिक्रिया दिली. पाण्याचे संकट पुढे वाढत जाणार आहे.

राज ठाकरे गंभीर इशारा देताना म्हणाले की, पुढे परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे. ग्रामीण भागातून लोकांचे तांडेच्या तांडे शहराकडे वळतील. घर-दार सोडून लोक बाहेर पडतील. ग्रामीण भागात जनावरांचा प्रश्न मोठा आहे. जालना शहरात १५ दिवसांतून एकदा पाणी येत आहे. पाण्याचे साठे व्हावेत यासाठी पाण्याच्या टाक्या बनविणाऱ्यांसाठी सरकार काम करत आहे का? असा सवालही राज ठाकरे यांनी उपस्थित केला.

# चीनला क्लीन चिट देणं बंद करा!

## अरुणाचल सीमेवरील संघर्षाच्या मुद्द्यांवरून मल्लिकार्जुन खरगे भडकले

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**अरुणाचल प्रदेशातील सीमावर्ती भागात भारतीय जवानांचा चिनी सैन्याशी सध्याही संघर्ष होत असल्याची माहिती इंडो-तिबेटियन बॉर्डर पोलीसचे (ITBP) महासंचालक शत्रूजीत कपूर यांनी दिली. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. शत्रूजीत कपूर यांनी केलेल्या या वक्तव्यानंतर भारत-चीन सीमेवरील तणावाची परिस्थिती पुन्हा एकदा चर्चेत आली आहे.**





भारत आणि चीनमध्ये मागील महिन्यांपासून शांततेसाठी लष्करी पातळीवर चर्चा सुरू आहे. मात्र, असं असतानाही सीमावर्ती भागातील तणाव पूर्णपणे निवळलेला नसल्याचं शत्रूजीत कपूर यांच्या वक्तव्यावरून आता स्पष्ट होत आहे. आयटीबीपीचे महासंचालक शत्रूजीत कपूर यांनी केलेल्या वक्तव्यानंतर काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे हे चांगलेच आक्रमक झाले आहेत.

या संपूर्ण प्रकरणाबाबत आता मल्लिकार्जुन खरगे यांनी पंतप्रधान मोदी यांच्याकडे स्पष्टीकरण मागितलं आहे. या संदर्भात पंतप्रधान मोदींनी देशासमोर सत्य काय आहे ते मांडलं पाहिजे, अशी मागणी करत चीनला क्लीन चिट देणं आता पुरे झालं, असं खरगे यांनी म्हटलं आहे. तसेच खरगे यांनी पंतप्रधान मोदींना तीन प्रश्न विचारले आहेत.

"चीनला क्लीन चिट देणं पुरे झालं. पंतप्रधान मोदींनी देशासमोर आता सत्य सांगितलंच पाहिजे आणि पुढील तीन प्रश्नांची उत्तरे दिली पाहिजेत", असं खरगे यांनी म्हटलं आहे.

१. राष्ट्रीय सुरक्षा : "अरुणाचल प्रदेशात पीएलएसोबत सुरू असलेल्या संघर्षाबाबत आयटीबीपी महासंचालकांनी दिलेली पुष्टी ही अत्यंत चिंताजनक आहे. डोकलाम आणि गलवाननंतर आता आणखी एक गंभीर संघर्ष उभा ठाकला आहे का? ऑगस्ट महिन्यात टक्सिंगजवळ चिनी घुसखोरी झाल्याचं वृत्त समोर आलं होतं. 'वाचा-दमाई' येथे कॉर्प्स कमांडर स्तरावरील चर्चा होऊन ४७ दिवस उलटले आहेत, तरीही संघर्ष सुरूच आहे. अरुणाचल प्रदेश हा भारताचा अविभाज्य भाग आहे. मग देशाला अंधारात का ठेवलं जात आहे?", असा सवाल मल्लिकार्जुन खरगे यांनी मोदींना केला आहे.

२. आर्थिक सुरक्षा : "गलवानमध्ये भारतीय सैन्याचे २० जवान शहीद झाल्यापासून (२०२०-२१ या आर्थिक वर्षात) चीनमधून होणारी आयात १०२ टक्क्यांनी वाढली, तर चीनबरोबरची भारताची व्यापार तूट १५५ टक्क्यांनी वाढून ११२.१६ अब्ज डॉलर्सवर पोहोचली. खुद्द अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनीही मान्य केलं आहे की चीन भारतीय निर्यातीमध्ये अडथळे निर्माण करत आहे. मग असं असतानाही सरकार चिनी गुंतवणुकीवरील निर्बंध शिथिल करत आहे आणि चीनशी संबंधित उद्योगांना पीएलआय योजनेचा लाभ देण्याचा विचार करत आहे. 'मेक इन इंडिया'चं रूपांतर 'इम्पोर्ट फ्रॉम चायना'मध्ये झालं आहे का?", असा सवाल खरगे यांनी सरकारला केला.

३.राजनैतिक उत्तरदायित्व : "पंतप्रधान मोदी आणि शी जिनपिंग यांच्यात आतापर्यंत किमान २३ वेळा संवाद झाला आहे. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्या नेतृत्वाखाली विशेष प्रतिनिधींच्या २५ फेऱ्या झाल्या आहेत. डब्ल्यूएमसीसीच्या ३६ बैठका झाल्या आहेत. तसेच एससीओ आणि ब्रिक्स शिखर परिषदाही पार पडल्या आहेत. या सर्व प्रयत्नांतून नेमकं काय साध्य झालं?", असा सवाल मल्लिकार्जुन खरगे यांनी केला.

"आमच्या सशस्त्र दलांवर आमचा पूर्ण विश्वास आहे. मात्र, राष्ट्रीय सुरक्षेच्या बाबतीत केवळ राजनैतिक 'फोटो-ऑप्स' किंवा आलिंगन नको, तर उत्तरदायित्व हवं आहे. विरोधकांवर टीका करण्याऐवजी पंतप्रधान मोदी यांनी संसद आणि देशाला विश्वासात घ्यावं", असं खरगे यांनी म्हटलं आहे.

## तिबेटमध्ये ७.० रिश्टर स्केलचा शक्तिशाली भूकंप; १० किमी खोलीवर भूकंपाचा केंद्रबिंदू

**महाईन्यूज । ल्हासा**

**तिबेटमध्ये गुरुवारी (२२ ऑक्टोबर) रात्री ८ वाजताच्या दरम्यान भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले आहेत. जर्मन रिसर्च सेंटर फॉर जिओसायन्सेसनुसार, गुरुवारी तिबेटच्या भागात ७.० रिश्टर स्केल तीव्रतेचे शक्तिशाली भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. हा भूकंप जमिनीपासून १० किमी इतक्या कमी खोलीवर झाला आहे. या भूकंपामुळे झालेले नुकसान किंवा जीवितहानी याबाबत अद्याप सविस्तर माहिती समोर आलेली नाही.**



उत्तर तिबेटमधील नागकू (Nagqu) या भागात भूकंपाचे धक्के बसले आहेत. सीईएनसीच्या नोंदीनुसार भूकंपाची खोली जमिनीखाली १० किलोमीटर होती. तसेच भूकंपाचा केंद्रबिंदू तिबेटची राजधानी ल्हासा शहरापासून सुमारे ४०० किमी अंतरावर होता. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.

दरम्यान, नेपाळ-चीन सीमेवरील डोंगराळ भागात विनाशकारी पूर आणि भूस्खलन झाल्याच्या घटनेनंतर काही आठवड्यांनंतरच हा भूकंप झाला आहे. नेपाळमधील नैसर्गिक आपत्तींमध्ये १ हजार ४०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाल्याचं सांगितलं जातं, तसेच अद्यापही शेकडो लोक बेपत्ता आहेत. दरम्यान, आता तिबेटमध्ये गुरुवारी झालेल्या या भूकंपामुळे जीवितहानी किंवा मालमत्तेचं किती नुकसान झालं, याबाबत अद्याप कोणतीही तात्काळ माहिती मिळालेली नाही. याबाबत अधिक तपशीलांची प्रतीक्षा आहे.

### तिबेटमध्ये एका वर्षापूर्वीही झाला होता भूकंप

तिबेटमध्ये २०२५ मध्ये सुमारे ७ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप झाला होता. ज्यामध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झालं होतं. अनेक घरे बाधित झाले होते. तेव्हा भूकंपाचा केंद्रबिंदू नेपाळजवळ होता. युनायटेड स्टेट्स जिओलॉजिकल सर्व्हे (USGS) नुसार गेल्या शतकात या प्रभावित भागात ६ किंवा त्यापेक्षा जास्त तीव्रतेचे किमान १० भूकंप झाले आहेत.



# रश्मिकाचं ट्रोलिंगवर उत्तर !

दाक्षिणात्य अभिनेत्री रश्मिका मंदाना हिने आपल्या अभिनयाच्या जोरावर मनोरंजनविश्वात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. दाक्षिणात्य चित्रपटांसोबतच तिने हिंदी चित्रपटसृष्टीतही लक्ष वेधक भूमिका साकारल्या आहेत. 'ॲनिमल', 'छावा', 'गुडबाय' आणि 'मिशन मजनू' यांसारख्या चित्रपटांमधून ती प्रेक्षकांच्या भेटीला आली. मात्र, हिंदी चित्रपटांमधील तिच्या बोलण्याच्या शैलीवरून आणि उच्चारांवरून तिला अनेकदा सोशल मीडियावर ट्रोलिंगचा सामना करावा लागला. आता याच मुद्द्यावर रश्मिकाने मौन सोडले असून आपली भूमिका व्यक्त केली आहे. रश्मिका मंदाना हिने आपल्या वैयक्तिक आणि व्यावसायिक आयुष्याबद्दल मनमोकळेपणाने संवाद साधला. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत तिने स्पष्ट केले की, चित्रपटसृष्टीत काम करण्यास सुरुवात केल्यापासून तिला वेगवेगळ्या कारणांमुळे टीकेचा सामना करावा लागला. कधी तिच्या अभिनयावरून, तर कधी भाषेवरून आणि उच्चारांवरून तिला लक्ष्य करण्यात आले. मात्र, या टीकेमुळे तिने स्वतःच्या करिअरवर मर्यादा घालण्याचा निर्णय घेतला नाही. रश्मिकाच्या मते, तिला कोणत्याही एका चित्रपटसृष्टीपुरते किंवा एका भाषेपुरते मर्यादित राहायचे नव्हते. तिला वेगवेगळ्या भाषांमध्ये काम करायचे असून विविध प्रकारच्या भूमिका साकारायच्या आहेत. टीका होत असली, तरी नव्या संधी स्वीकारण्याचा निर्धार कायम असल्याचे रश्मिका म्हणाली.



# 'तनु वेड्स मनु 3' मध्ये कंगना?

बॉलिवूडमधील लोकप्रिय रोमँटिक कॉमेडी चित्रपट 'तनु वेड्स मनु' आणि त्याच्या सिक्वेलला प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला होता. कंगना रणौत आणि आर. माधवन यांच्या जोडीने या चित्रपटांमधून प्रेक्षकांची मने जिंकली. आता या लोकप्रिय फ्रँचायझीच्या तिसऱ्या भागाविषयी महत्वाची अपडेट समोर आली आहे. तिसऱ्या भागात मोठा बदल पाहायला मिळण्याची शक्यता आहे. कंगना रणौत आणि आर. माधवन यांची जुनी पात्रे दिसणार नसून, नव्या कलाकारांसह एक वेगळी कथा प्रेक्षकांसमोर आणण्याची तयारी सुरू असल्याचे वृत्त आहे. मिड-डेच्या वृत्तानुसार, दिग्दर्शक मिताक्षरा कुमार या फ्रँचायझीच्या तिसऱ्या भागावर काम करत आहे. यावेळी निर्मात्यांचा भर जुन्या पात्रांची कथा पुढे नेण्याऐवजी नवीन पात्रांच्या माध्यमातून एक वेगळी प्रेमकथा सादर करण्यावर आहे. मात्र, चित्रपटातील विनोद, बिनधास्तपणा आणि हटके शैली कायम ठेवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. मात्र, नव्या भागातील कलाकारांची नावे अद्याप अधिकृतपणे जाहीर करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे या चित्रपटात कोणत्या नव्या चेहऱ्यांना संधी मिळणार, याबाबत चाहत्यांमध्ये उत्सुकता आहे.

# 'रामायण'च्या ॲडव्हान्स बुकिंगला तुफान प्रतिसाद

गेल्या अनेक दिवसांपासून प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत असलेला 'रामायण' हा भव्य चित्रपट अखेर ५ नोव्हेंबर २०२६ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. दिग्दर्शक नितेश तिवारी यांच्या या महत्त्वाकांक्षी चित्रपटाबाबत प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता आहे. चित्रपटाच्या ॲडव्हान्स बुकिंगला सुरुवात झाली असून, पहिल्या दिवसाच्या शोसाठी तिकीट खरेदी करण्याकडे चाहत्यांचा कल दिसत आहे. विशेष म्हणजे, मुंबईतील काही चित्रपटगृहांमध्ये प्रीमियम सीट्सच्या तिकिटांचे दर तब्बल २ हजार पोहोचल्याचे सांगितले जात आहे. 'रामायण'मध्ये अभिनेता रणबीर कपूर प्रभू श्रीरामांची भूमिका साकारत आहे. त्याच्यासोबत साई पल्लवी माता सीतेच्या, यश रावणाच्या, सनी देओल हनुमानाच्या आणि रवी दुबे लक्ष्मणाच्या भूमिकेत दिसणार आहेत. दमदार कलाकारांची फळी आणि भव्य निर्मितीमुळे बॉलिवूडमधील सर्वाधिक चर्चेत असलेला हा चित्रपट आहे. चित्रपटाच्या ॲडव्हान्स बुकिंगबाबत समोर आलेल्या



प्राथमिक आकडेवारीनुसार, पहिल्या दिवसाच्या तिकीट विक्रीतून सुमारे ८.१६ कोटी रुपयांची कमाई झाल्याचा दावा करण्यात आला आहे. ही आकडेवारी SACNILC च्या प्राथमिक नोंदींवर आधारित असल्याचे सांगितले जात आहे. चित्रपटाच्या प्रदर्शनाला अद्याप काही दिवस बाकी असतानाच तिकीट विक्रीला मिळणारा प्रतिसाद पाहता, प्रदर्शनाच्या पहिल्या दिवशी मोठी गर्दी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतरच त्याच्या प्रत्यक्ष कमाईचे चित्र स्पष्ट होईल. 'रामायण' हा चित्रपट हिंदी, तमिळ, तेलुगू, कन्नड, मल्याळम आणि इंग्रजी अशा सहा भाषांमध्ये प्रदर्शित होणार आहे. भव्य बजेट, लोकप्रिय कलाकार, रामायणासारखा विषय आणि ॲडव्हान्स बुकिंगबाबत समोर येणारे आकडे यामुळे 'रामायण'कडून मोठ्या अपेक्षा व्यक्त केल्या जात आहेत. चित्रपट पहिल्याच दिवशी बॉक्स ऑफिसवर किती कमाई करतो आणि प्रेक्षकांचा प्रतिसाद कसा मिळतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# विराटनं दिलेला शब्द पाळला नाही

## अमित मिश्राने विराट कोहली आणि अनिल कुंबळे यांच्यावर आरोप केले; फोनही उचलला नाही

**महाईन्यूज । मुंबई**

**भारताचा फिरकीपटू अमित मिश्राने आंतरराष्ट्रीय कारकिर्दीला रामराम ठोकून आता बराच काळ उलटला आहे. अमित मिश्रा हा भारतीय क्रिकेटमधील असा खेळाडू आहे ज्याने अनेकवेळा पुनरागमन केलं आहे. मात्र एकदा त्याला असं वाटलं होतं की आता आपण कधीच पुनरामन करू शकणार नाही. इंग्लंडमध्ये २०१७ मध्ये त्याने शेवटचा आंतरराष्ट्रीय टी २० सामना खेळला होता. त्यापूर्वी एक वर्ष आधी विराट कोहली भारतीय संघाचा कर्णधार झाला होता. त्यावेळी विराटने अमित मिश्राला एक आश्वासन दिलं होतं. मात्र ते आश्वासन त्याने पाळलं नाही असा दावा अमित मिश्राने केला आहे.**




अमित मिश्राने विराट कोहली आणि अनिल कुंबळे यांच्यावर आरोप केले आहेत. आकाश चोप्रासोबत पॉकास्टमध्ये बोलताना त्याने हे आरोप केले आहेत. अमित मिश्रा म्हणतो की अनिल कुंबळे आणि विराट कोहली या दोघांनीही मला आश्वासन दिलं होतं. ते काही पाळलं गेलं नाही अन् बंगळुरूमधील इंग्लंडविरूद्धचा सामना माझ्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील शेवटचा सामना ठरला आहे.

अमित मिश्रा पॉडकास्टमध्ये म्हणाला, 'बंगळुरूच्या सामन्यावेळी माझ्या पायाला दुखापत झाली होती. मी दुखापतग्रस्त होऊन जात होतो. त्यावेळी अनिल कुंबळे प्रशिक्षक होता. मी अनिल भाईला विचारले. त्यावेळी ते म्हणाले की काळजी करू नकोस तू फिट होऊन ये. तू आपोआपच संघात येशील.' त्यानंतर विराट कोहली संघाचा कर्णधार झाला. मी विराट कोहलीला देखील विचारले. काय करायलं हवं असं मी त्याला विचारलं होतं. त्यावेळी त्याने तू चिंता करू नकोस पूर्णपणे फिट हो, कम्फर्टेबल हो. तू संघात आहेस.

त्यानंतर अमित मिश्रा हा दुखापतीतून सावरला अन् त्यानंतर त्याने विराट कोहलाला फोन केले. मेसेज केले मात्र विराटने त्याचे काही उत्तरच दिलेले नाही. मिश्रा पुढे म्हणाला की, यानंतर मी विराट कोहलीकडे गेलो अन् विचारलं भाई काय परिस्थिती आहे. त्यावेळी त्याने एक आठवडा ते दहा दिवसात याबाबत सांगतो असं सांगितलं. एक आठवडा झाला, दोन आठवडे झाले, तीन आठवडे झाले त्याच्याकडून काही अपडेट नाही. मी देखील त्याला फोन केला मात्र त्याने उचलला नाही. मेसेज केला मात्र काही रिप्लाय नाही.'

### विषयच सोडून दिला

अमित मिश्राने सांगितलं की त्याच्यापेक्षा जास्त काळ बाहेर असलेले खेळाडू संघात पुन्हा आले. मात्र मला घेण्यात आलं नाही. दिल्ली कॅपिटल्सचा फिरकी प्रशिक्षक झालेल्या अमित मिश्राने सांगितलं की, 'मी अनेकवेळा कॉल मेसेज केले. उत्तर आलं नाही म्हटल्यावर मी देखील जाऊ दे म्हणालो आणि सोडून दिलं. जर एखाद्या व्यक्तीला तुम्ही नको आहात तर तुम्ही काय करू शकता. ज्यावेळी तुमच्यापेक्षा जास्त दुखापतग्रस्त झालेले खेळाडू खूप काळ दुखापतग्रस्त राहिलेले खेळाडू त्यांचे पुनरागमन होते. तरी मला कोणता मेसेजच येत नाही. त्यावेळी तुम्ही काय करू शकता?

# मुंबई इंडियन्सच्या रहस्यमयी पोस्टचा अर्थ काय? हार्दिक पांड्यासाठी धोक्याची घंटा?

**महाईन्यूज । मुंबई**

**आयपीएलमधील सर्वात यशस्वी संघ असलेल्या मुंबई इंडियन्सच्या ताफ्यात आगामी हंगामाआधी मोठी उलथापालथ होणार असल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून रंगत आहे. आगामी हंगामासाठी संघ बांधणी करताना नव्या प्रशिक्षकासोबत नवा कर्णधार आणि काही स्टार खेळाडूंच्या ट्रेंड माध्यमातून MI च्या ताफ्यात मोठे बदल होण्याचे संकेत आहेत. MI च्या अधिकृत अकाउंटवरुन शेअर करण्यात आलेल्या पोस्टमधूनही त्याची हिंट मिळाली आहे.**



महिला जयवर्धने यांनी प्रशिक्षक पदाचा राजीनामा दिल्यानंतर त्यांची जागा कोण घेणार? यासह MI च्या ताफ्यात कॅप्टन्सीच्या बदलासह खेळाडूंची मोठी ट्रेड डील पाहायला मिळणार का? हा प्रश्न चांगलाच गाजताना दिसतोय. त्यात आता MI च्या सोशल मीडिया पोस्टनं यासंदर्भातील उत्सुकता वाढवली आहे.

एका सोशल मीडिया वापरकर्त्याने मुंबई इंडियन्स संघातील बदलाची घोषणा करणार का? असा प्रश्न उपस्थितीत करणारी एक मीम्स शेअर केली होती. मुंबई इंडियन्स प्रशिक्षक, कर्णधार आणि ट्रेडसंदर्भात मोठी प्रतीक्षा करत आहे. यावर MI च्या अधिकृत सोशल मीडिया अकाउंटवरुन अगदी रहस्यमयी रिप्लाय देण्यात आला आहे.

मुंबई इंडियन्सच्या अधिकृत सोशल मीडिया हँडेलवरुन करण्यात आलेल्या ट्विटमध्ये फ्रँचायझी संघाने 'Loading...' GIF पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टचा नेमका अर्थ लावणं कठीण असले तरी MI च्या ताफ्यात संघातील मोठ्या बदलासंदर्भात काही तरी शिजत आहे, हे स्पष्ट होते. हार्दिक पांड्यासाठी MI ची रहस्यमयी पोस्ट धोक्याची घंटा आहे का? अशी चर्चा रंगण्यासही सुरुवात झाली आहे. पण जोपर्यंत अधिकृतरित्या काही घोषणा होत नाही तोपर्यंत सत्य काय ते गुलदस्त्यातच राहिल. आयपीएल २०२४ आधी हार्दिक पांड्या मोठ्या ट्रेड डीलच्या माध्यमातून गुजरात टायटन्सची साथ सोडून पुन्हा मुंबई इंडियन्सच्या संघात आला. रोहित शर्माच्या जागी त्याला संघाचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली. पण त्याच्या कॅप्टन्सीत संघाला लौकिकाला साजेसा खेळ करता आला नाही. सध्याच्या घडीला हार्दिक पांड्या दुखापतीनं त्रस्त असून तो भारतीय संघाचाही भाग नाही. त्यामुळे पांड्या ट्रेड झाली नाही तरी तो MI च्या कर्णधारपदी कायम राहिल याबाबत शंकाच वाटते.

### मुंबई इंडियन्सच्या ताफ्यात मोठे बदल पाहायला मिळणार?

मुंबई इंडियन्स संघात मोठे बदल होणार का, असा प्रश्न उपस्थित करणारा एक मीम सोशल मीडियावर शेअर करण्यात आला आहे. या मीममुळे क्रिकेट चाहत्यांमध्ये चर्चेला सुरुवात झाली आहे. मुंबई इंडियन्स संघाच्या प्रशिक्षक, कर्णधार आणि खेळाडूंच्या ट्रेडबाबत चाहत्यांना मोठी उत्सुकता लागली आहे. याच पार्श्वभूमीवर मुंबई इंडियन्सच्या अधिकृत सोशल मीडिया अकाउंटवरून या मीमला उत्तर देण्यात आले आहे. मात्र, संघाकडून देण्यात आलेल्या या रिप्लायमध्ये कोणताही स्पष्ट खुलासा करण्यात आलेला नाही. त्यामुळे मुंबई इंडियन्स आगामी काळात नेमकी कोणती घोषणा करणार, याबाबत चाहत्यांची उत्सुकता आणखी वाढली आहे.


Are You
STRUGGLING
With :
Knee Pain
Knee Swelling
Knee Stiffness
Decrease In Knee Mobility
It can be a sign of infection, consult our experts now!
020-67313000 / +91 98220 55986
Sainath Hospital, Sant Nagar, Sector no. 4, Moshi Pradhikaran, Pune - Nashik Highway, Pune 412105
SAINATH HOSPITAL
Assuring Quality Care
Center Of Excellence For Trauma & Joint Replacement Surgery
www.sainathhospital.com

# कचरा प्रकल्पावरून राजकारण; रावेतवर भार!

## मोशी दुर्घटनेनंतर निगडी, प्राधिकरणवासीयांमध्ये चिंता, शहराच्या कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न कायम

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मोशी कचरा डेपोतील दुर्घटनेनंतर शहरातील कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. दुर्घटनेची चौकशी, दोषींवर कारवाई आणि कचरा प्रक्रियेच्या पर्यायी व्यवस्थेची मागणी होत असतानाच, दुसऱ्या वेस्ट टू एनर्जी प्रकल्पासाठी रावेत येथील जागेचा पर्याय पुढे आला आहे. मात्र, विविध भागांतील प्रस्तावित कचरा प्रक्रिया प्रकल्पांना होत असलेला विरोध, राजकीय आरोप-प्रत्यारोप आणि स्थानिक नागरिकांच्या हरकती यामुळे प्रशासनासमोर पेच निर्माण झाला आहे. या राजकीय दबावाच्या पार्श्वभूमीवर रावेत, निगडी आणि प्राधिकरण परिसरातील नागरिकांवर नव्या प्रकल्पाचा भार पडणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.**



दि. ८ जुलै २०२६ रोजी मोशी कचरा डेपोतील कचऱ्याचा मोठा ढिगारा प्रशासकीय इमारतीवर कोसळला. या दुर्घटनेत नऊ कामगारांचा मृत्यू झाला, तर बारा जण जखमी झाले. त्यानंतर प्रकल्पाच्या सुरक्षिततेबाबत आणि संबंधित अधिकारी व ठेकेदारांच्या जबाबदारीबाबत प्रश्न उपस्थित झाले. महापालिकेच्या पर्यावरण विभागातील दोन अभियंत्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली असून, ठेकेदार कंपनीच्या दोन अधिकाऱ्यांविरोधातही गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणाची चौकशी सुरू आहे.

दुर्घटनेनंतर खासदार श्रीरंग बारणे, नगरसेविका सुलभा उबाळे आणि सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर यांनी विविध माध्यमांतून प्रशासनाला जाब विचारला. उच्चस्तरीय चौकशी, श्वेतपत्रिका आणि संबंधितांवर कारवाईची मागणी करण्यात आली. या मागण्यांमुळे कचरा व्यवस्थापन आणि प्रशासनाच्या उत्तरदायित्वाचा मुद्दा राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आला. मात्र, दुर्घटनेनंतरच्या राजकीय आरोप-प्रत्यारोपांमुळे प्रश्न सुटण्याऐवजी गुंतागुंत वाढल्याची टीका होत आहे.

दरम्यान, मोशी डेपोतील दररोज ३७५ टन ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून बायोगॅस निर्मिती करण्याच्या प्रस्तावावरही प्रश्न उपस्थित करण्यात आले. दि. ६ ऑगस्ट रोजी झालेल्या पत्रकार परिषदेत सुलभा उबाळे आणि संदीप वाघेरे यांनी निविदेतील आर्थिक अटी, ठेकेदाराला मिळणारे शुल्क आणि महापालिकेला होणारा फायदा याबाबत शंका व्यक्त केल्या. या प्रस्तावाची स्वतंत्र तज्ज्ञ समितीकडून तपासणी करण्याची मागणीही करण्यात आली.

पुनावळे येथील कचरा डेपोच्या आरक्षणाला स्थानिक नागरिक आणि सोसायटीधारकांनी विरोध केला होता. त्यानंतर रावेत येथील जलशुद्धीकरण केंद्रालगतच्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) सुमारे २५ एकर जागेचा पर्याय पुढे आला. महापालिका आयुक्तांनी दि. ८ सप्टेंबर रोजी नगरविकास विभागाकडे या जागेच्या हस्तांतरणाची मागणी केली आहे. रावेतमधील प्रस्तावित जागा दुर्गा टेकडी, जलशुद्धीकरण केंद्र आणि निवासी वसाहतींच्या जवळ असल्याने स्थानिक नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे. दि. १७ ऑक्टोबर रोजी झालेल्या बैठकीत शंभरहून अधिक नागरिक सहभागी झाले होते. प्रकल्पामुळे परिसरातील पर्यावरण, वाहतूक आणि नागरिकांच्या आरोग्यावर संभाव्य परिणाम होण्याबाबत त्यांनी प्रश्न उपस्थित केले. गरज पडल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा निर्धारही व्यक्त करण्यात आला.

एका बाजूला शहरातील कचरा व्यवस्थापनासाठी आधुनिक प्रकल्पांची गरज आहे, तर दुसऱ्या बाजूला निवासी परिसरांजवळ अशा प्रकल्पांना नागरिकांचा विरोध होत आहे. प्रत्येक भागातील विरोधामुळे पर्यायी जागांचा शोध अधिक कठीण होत असल्याचे चित्र आहे. दि. ८ जुलै ते २३ ऑक्टोबर या १०८ दिवसांच्या कालावधीत दररोज सरासरी दीड हजार टन कचरा निर्माण झाल्याचे गृहीत धरल्यास सुमारे एक लाख ६२ हजार टन कचरा संकलित झाल्याचा अंदाज आहे. त्यामुळे कचऱ्याची साठवण, शास्त्रोक्त प्रक्रिया आणि भविष्यातील वाढत्या गरजांसाठी सक्षम व्यवस्था उभारणे आवश्यक आहे. शहरातील कचरा हा संपूर्ण पिंपरी-चिंचवडचा प्रश्न आहे. त्यावरील उपाययोजनांची जबाबदारीही सामूहिक असणे गरजेचे आहे. मोशीतील दुर्घटनेची सखोल चौकशी करून जबाबदारी निश्चित करणे, सुरक्षित तंत्रज्ञानाचा वापर करणे, सर्व पर्यायांचा अभ्यास करणे आणि नागरिकांना विश्वासात घेऊन निर्णय घेणे आवश्यक आहे. राजकीय आरोप-प्रत्यारोपांपेक्षा ठोस उपाययोजनांना प्राधान्य दिल्यासच शहरातील कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न सुटू शकतो.

### विकेंद्रित प्रकल्पांनाही विरोध

मोशीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी १६ जुलै रोजी प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात एक याप्रमाणे दहा अत्याधुनिक कचरा प्रक्रिया केंद्रांसाठी जागा शोधण्याचे निर्देश दिले होते. मात्र, विविध भागांत या प्रस्तावांना विरोध झाला. यमुनानगर येथील जागेबाबतही विरोधाचे निवेदन देण्यात आले. परिणामी, शहरात निर्माण होणाऱ्या कचऱ्यावर स्थानिक पातळीवर प्रक्रिया करण्याच्या नियोजनासमोर अडचणी निर्माण झाल्या.

### रावेतचा पर्याय कसा पुढे आला?

मोशी दुर्घटनेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २७ मेगावॅट क्षमतेचा दुसरा वेस्ट टू एनर्जी प्रकल्प उभारण्याचे निर्देश दिले होते. शहरातील कचऱ्याचे वाढते प्रमाण आणि मोशीवरील अवलंबित्व लक्षात घेता पर्यायी व्यवस्था उभारण्याची गरज व्यक्त करण्यात आली. मात्र, मोशीतील उपलब्ध जागेच्या मर्यादा आणि दुर्घटनेनंतर निर्माण झालेली परिस्थिती यामुळे दुसऱ्या प्रकल्पासाठी पर्यायी जागेचा शोध सुरू झाला.

# वडगाव मावळमध्ये पाणीटंचाईचे संकट; शुक्रवारपासून दिवसाआड पाणीपुरवठा

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पाणीटंचाई निर्माण झाल्यामुळे पाणीसाठ्याचे नियोजन करण्याच्या दृष्टीने शुक्रवार पासून वडगाव शहराला एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येणार असल्याची माहिती नगराध्यक्षा अबोली ढोरे, मुख्याधिकारी डॉ. प्रवीण निकम यांनी दिली.**



दुष्काळाशी लढा देण्यासाठी आजच पाण्याची बचत करण्याची आवश्यकता असल्याने नगरपंचायतीच्या वतीने दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नागरिकांनी नळाला गळती असल्यास ती त्वरित दुरुस्त करून घ्यावी.

टाकी अथवा हौद भरताना ओव्हर फ्लो टाळावा. वाहने व अंगण धुण्यासाठी पाण्याचा अनावश्यक वापर टाळावा. शहरातील सर्व नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करावा अंघोळ, कपडे, भांडी धुण्यासाठी आवश्यक तेवढेच पाणी वापरावे व पाण्याची बचत करून नगरपंचायत प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच घरातील पाण्याच्या टाक्या किंवा हौद भरताना पाणी ओसंडून वाहणार नाही, याची काळजी घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. टाकी भरल्यानंतर पंप बंद करणे, पाण्याचा अनावश्यक वापर टाळणे आणि गरजेपुरतेच पाणी साठवणे यांसारख्या साध्या उपायांमधूनही पाण्याची बचत करता येऊ शकते.

### पाण्याचा अपव्यय टाळण्याचे आवाहन

शहरातील प्रत्येक नागरिकाने पाण्याचा वापर करताना दक्षता घेण्याची गरज आहे. घरातील नळांना गळती असल्यास ती तातडीने दुरुस्त करून घ्यावी, असे आवाहन नगरपंचायतीने केले आहे. अनेकदा नळ किंवा पाइपमधून होणारी गळती दुर्लक्षित केली जाते. मात्र, अशा प्रकारे मोठ्या प्रमाणात पाण्याचा अपव्यय होऊ शकतो. त्यामुळे घरगुती पाणीपुरवठा यंत्रणेची नियमित तपासणी करून गळती रोखणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# स्वच्छ, हरित दिवाळीसाठी RRR केंद्रांचा पुढाकार

## पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आवाहन; जुन्या वस्तूंना मिळणार नवा उपयोग, गरजूंनाही मदत

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**दिवाळीच्या पार्श्वभूमीवर घराची साफसफाई करताना वापरात नसलेल्या, मात्र सुस्थितीत असलेल्या वस्तू कचऱ्यात फेकून देण्याऐवजी त्या पुनर्वापरासाठी देण्याचे आवाहन पिंपरी-चिंचवड महापालिकेने केले आहे. यासाठी महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत शहरात रिड्यूस, रियुज आणि रिसायकल (RRR) केंद्रांचा उपक्रम राबविण्यात येत आहे. या केंद्रांच्या माध्यमातून जुन्या वस्तूंचा पुनर्वापर, कचऱ्याचे प्रमाण कमी करणे आणि गरजू नागरिकांना मदत करणे, अशी तिहेरी उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न आहे.**

दिवाळीच्या निमित्ताने अनेक घरांमध्ये साफसफाई केली जाते. यावेळी जुने कपडे, पुस्तके, वह्या, खेळणी, भांडी, चादरी, पडदे, फर्निचर आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणे यांसारख्या वस्तू अनेकदा अडगळ समजून फेकून दिल्या जातात. मात्र, यातील अनेक वस्तू वापरण्यायोग्य स्थितीत असतात. अशा वस्तू थेट कचऱ्यात टाकण्याऐवजी त्यांचा पुनर्वापर केल्यास पर्यावरणाचे संरक्षण होण्यासोबतच गरजू कुटुंबांनाही त्यांचा लाभ मिळू शकतो. अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनीही नागरिक आणि गृहनिर्माण संस्थांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले आहे. उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी दिवाळीच्या साफसफाईदरम्यान वापरण्यायोग्य वस्तू वेगळ्या काढून त्या आरआरआर केंद्रांमध्ये जमा करण्याचे आवाहन केले आहे. लोकसहभागातून स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक बांधिलकी या तिन्ही गोष्टींना चालना मिळू शकते.

महापालिकेच्या आठ क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीत आरआरआर केंद्रांचे जाळे उभारण्यात आले आहे. मोरवाडी, आकुर्डी, निगडी, प्राधिकरण, चिंचवड, थेरगाव, रावेत, काळेवाडी, भोसरी, मोशी, इंद्रायणीनगर, पिंपळे निलख, पिंपळे गुरव, वाकड, दिघी, चिखली, रूपीनगर, रहाटणी, पिंपरी आणि सांगवीसह शहरातील विविध भागांत वस्तू जमा करण्यासाठी केंद्रे उपलब्ध आहेत. नागरिकांना वस्तू संकलनासंदर्भात अधिक माहिती घेण्यासाठी किंवा संकलनासाठी संपर्क साधण्यासाठी ७०३०९०१९९३ आणि ९१६८६८४६७० हे क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले आहेत. गृहनिर्माण संस्था आणि सोसायट्यांनीही या उपक्रमात पुढाकार घेऊन रहिवाशांकडील वापरण्यायोग्य वस्तू संकलित करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेने केले आहे. कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन ही केवळ महापालिकेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचा त्यात महत्त्वाचा वाटा आहे. वस्तूंचा अनावश्यक वापर टाळणे, वापरण्यायोग्य वस्तू पुन्हा वापरणे आणि पुनर्चक्रणयोग्य साहित्य योग्य ठिकाणी जमा करणे या सवयींमुळे पर्यावरणावरील ताण कमी होऊ शकतो. सणासुदीच्या काळात निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण कमी करण्यासाठीही अशा उपक्रमांची मदत होते.

दिवाळी हा आनंद, प्रकाश आणि नवचैतन्याचा सण आहे. या आनंदात सामाजिक बांधिलकीची जोड देत घरातील अडगळ ठरलेल्या वस्तू गरजूंसाठी उपयोगी ठरू शकतात. त्यामुळे नागरिकांनी वस्तू थेट कचऱ्यात फेकण्याऐवजी त्यांची स्थिती तपासून पुनर्वापरासाठी द्याव्यात. ‘स्वच्छ दिवाळी, हरित दिवाळी’ ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी नागरिकांनी आरआरआर केंद्रांच्या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन महापालिकेने केले आहे.



### जुन्या वस्तूंना मिळणार नवे आयुष्य

महापालिकेच्या आरआरआर केंद्रांमध्ये पुनर्वापर करता येण्याजोग्या वस्तू जमा करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. घरातील जुनी पुस्तके, वह्या, शालेय साहित्य, सुस्थितीतील कपडे, खेळणी, भांडी, चपला, चादरी, पडदे, फर्निचर आणि विविध घरगुती वस्तू नागरिकांना या केंद्रांमध्ये जमा करता येतील. इलेक्ट्रॉनिक उपकरणांसह इतर पुनर्वापरयोग्य वस्तूंचाही या उपक्रमात समावेश आहे. या वस्तूंचा योग्य पद्धतीने पुनर्वापर झाल्यास त्यांचे आयुष्य वाढण्यास मदत होईल. वापरण्यायोग्य वस्तू गरजूंपर्यंत पोहोचविण्याची संधीही निर्माण होईल.

> “ स्वच्छ, सुंदर आणि हरित शहर घडविण्यासाठी प्रत्येक नागरिकाचा सहभाग महत्त्वाचा आहे. घरातील वापरात नसलेल्या; मात्र सुस्थितीत असलेल्या वस्तू कचऱ्यात न टाकता आर.आर.आर. केंद्रात जमा कराव्यात. जुन्या कपड्यांपासून पुस्तके, खेळणी, भांडी व फर्निचर अशा वस्तूंचा पुनर्वापर करून त्या गरजू व्यक्तींपर्यंत पोहोचवता येतील. यामुळे कचरा कमी होऊन पर्यावरणाचे संवर्धन होईल. दिवाळीनिमित्त नागरिकांनी व गृहसंकुलांनी या उपक्रमात सहभागी होऊन स्वच्छ, पर्यावरणपूरक आणि शाश्वत पिंपरी-चिंचवड शहर घडविण्यासाठी महापालिकेला सहकार्य करावे.
>
> **- डॉ.विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

# २२ ऑक्टोबरची मुदत संपली; पवना धरणग्रस्तांचे प्रश्न अद्याप प्रलंबित

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पवना धरणग्रस्त शेतकऱ्यांचे प्रलंबित प्रश्न २२ ऑक्टोबरपर्यंत मार्गी लावण्याची मुदत संपली आहे. मात्र, धरणग्रस्तांच्या मागण्यांवर काय ठोस निर्णय झाला, याबाबत अद्याप स्पष्टता नसल्याने शासनाच्या कार्यवाहीकडे धरणग्रस्तांचे लक्ष लागले आहे. आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलन स्थगित केले; मग प्रश्न सोडवण्यासाठी नेमकी कोणती पावले उचलली, असा सवाल उपस्थित होत आहे.**

पवना धरणग्रस्त शेतकऱ्यांच्या पुनर्वसनासह विविध प्रलंबित मागण्यांसाठी २ ऑक्टोबर रोजी जलसमाधी आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली आंदोलनाची तयारी करण्यात आली होती. त्यानंतर मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयाकडून लेखी आश्वासन मिळाल्याने आंदोलन स्थगित करण्यात आले. मात्र, प्रश्न मार्गी न लागल्यास २२ ऑक्टोबर रोजी दुप्पट ताकदीने आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला होता.



पवना धरणासाठी जमिनींचा त्याग करणाऱ्या अनेक शेतकरी कुटुंबांचे पुनर्वसन अद्याप प्रलंबित असल्याचा दावा धरणग्रस्त संघटनांनी केला आहे. जमीन संपादन, मोबदला, पात्र खातेदारांचे पुनर्वसन, वारसांचे हक्क आणि पुनर्वसित गावांतील मूलभूत सुविधांचे प्रश्न अद्याप कायम आहेत. अनेक वर्षांपासून पाठपुरावा करूनही प्रश्न सुटत नसल्याने धरणग्रस्तांमध्ये नाराजी आहे.

### भूमिका काय?

२२ ऑक्टोबरपर्यंत प्रश्न सोडवण्याचा इशारा दिल्यानंतर आता धरणग्रस्त संघटना पुढे कोणती भूमिका घेणार, याकडे मावळ तालुक्याचे लक्ष लागले आहे. शासनाने दिलेल्या आश्वासनानुसार संबंधित विभागांची बैठक झाली का, पुनर्वसनाबाबत निर्णय झाला का आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी कधी होणार, या प्रश्नांची उत्तरे अद्याप मिळणे आवश्यक आहे.


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046